पाल्मर-शेतकऱ्याच्या गाडीची सफर

मराठी : अश्विनी बर्वे



पाल्मर-शेतकऱ्याच्या गाडीची सफर

मराठी : अश्विनी बर्वे





सूर्य उगवायच्या एक तास आधी पाल्मर शेतकरी हळूवार पावलांनी घराच्या बाहेर निघाला आणि गोठ्यात जाऊन त्याने आपला साथी एबेनेजरला उठवले.

त्याने कंदील लावला आणि तो गाडीच्या खांबावर टांगले. सवयीनुसार बडबडत गाढव एबेनेजरने गाडीच्या पट्ट्या स्वतःच स्वतःला बांधल्या आणि गाडीला जोडून घेतले. मग पाल्मर उडी मारून गाडीत बसला आणि बाजाराला निघाला. कांदे, लेट्युस आणि बीट विकायला तो निघाला.

जवळजवळ आठ वाजता ते शहरात पोहचले. एबेनेजर बिचारा दमून-भागून आपले डोके हलवत मोठा चष्मा लावून जमीन हुंगत राहिला. दहा वाजेपर्यंत सगळ्या भाज्या विकल्या गेल्या. पाल्मरचा खिसा आता पैशांनी भरला होता. घरच्यांसाठी काही भेटवस्तू घेण्यासाठी त्याने काही पैसे खर्च केले. त्याने आपल्या सुंदर-जाड्या बायकोसाठी एक कॅमेरा घेतला. आपल्या जाडा मुलगा मक साठी अवजारे घेतले. त्याला काही गोष्टी बनवण्याची आवड होती. आपल्या जाड्या मुलीसाठी त्याने सायकल घेतली, कारण ती बऱ्याच दिवसांपासून ती मागत होती. आपल्या दुसऱ्या जाड्या मुलासाठी एक हार्मोनिका घेतली, कारण तो संगीत प्रेमी होता. त्याच्या स्वतःसाठी चांदीचे घड्याळ आणि म्हातारा गाढव एबेनेजर साठी,ज्याला ऊन आवडत नाही त्याच्यासाठी एक गवताची टोपी घेतली.

एबेनेज़रला काही भेटवस्तू मिळेल असे वाटत नव्हते. आनंदात लाजून त्याने पाल्मर शेतकऱ्याला मिठी मारली आणि म्हणाला, “माझी शेपूट हलवा”

तहान भागवण्यासाठी त्यांनी सरबत प्यायले आणि दोघे दुपारी घराकडे निघाले. जर सगळं काही ठीक-ठाक असेल तर, सगळं ठीकठाक का नसणार, तर पाल्मरच्या अंदाजानुसार ते दोघे दुपारी तीन वाजेपर्यंत शेतावर पोहचतील.



ऑगस्टचा महिना होता,सूर्य चमकत होता.ऊन तापत होते. ते गप्पा मारत मारत पुढे निघाले. एबेनेजर म्हणाला, जर पाऊस पडला तर बरं होईल, आणि शांत वाटेल. पाल्मरने त्याच्या हो मध्ये हो मिसळले.



मग दोघे किड्यांचे आवाज - किर-किर, किलबिल ऐकत चुपचाप पुढे निघाले. पाल्मर शेतकऱ्याने लाल रंगाच्या कपड्याने आपले कपाळ पुसले आणि तो आपल्या घराचा विचार करू लागला. तो लवकरच आपल्या प्रेमळ मोठ्या परिवारा जवळ पोहचेल आणि त्यांना भेटवस्तू दिल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर कसा आनंद दिसेल, तो आनंद त्याला बघायचा होता.

थोड्याच वेळात जंगलातल्या एका खडकाळ रस्त्यावरून गाडी जाऊ लागली. जशी गाडी चढ-उतारावरून जाऊ लागली तसे गाडीला काळ्या ढगांनी घेरले. वेगाने हवा वाहू लागली आणि झाडाची पाने जोराने इकडे तिकडे उडू लागले. मग ज्या पावसाची आस त्यांना लागली होती, तो ही आला. आधी हळूहळू मग मुसळधार.

सडकेवरची धूळ गायब झाली. त्याच्यावर पाणी आले. सुरुवातीला वीजेची भीतीदायक गर्जना दूरवरून ऐकू आली, मग ती खूप जवळ आली आणि मग तलवारी सारखी ती झाडाच्या मधोमध जोरात पडली.

एबेनेज़र आणि पाल्मर शेतकऱ्याने वीज झाडावर पडतांना पाहिली. दोघे खूप घाबरले. दोघांपैकी कोणालाच मरायचे नव्हते.

झाड गाडीवर वेगाने पडत होते. जसे झाड गाडीवर पडले आणि गाडी जोरात हलली. डुक्कर आणि गाढवाला काहीच लागले नाही याला चमत्कार समजायला पाहिजे. दोघे फांद्या आणि पानांमध्ये झाकले गेले आणि गाडी दलदलीत फसली.

पाल्मरने एबेनेजर कडे पाहिले आणि मग वर आकाशात पाहिले आणि म्हटले, “मी आता कसा माझ्या प्रेमळ पत्नी आणि मुलांकडे जाऊ शकेल?” यावर गाढवाने काहीच उत्तर दिले नाही आणि देवानेही काही उत्तर दिले नाही. आपल्या प्रश्नाबद्दल जास्त विचार न करता त्याने झाडाच्या पडलेल्या फांद्यामध्ये हात घालून मैक साठी खरेदी केलेली अवजारांची पेटी शोधून काढली. आणि त्यातून कुऱ्हाड आणि करवत काढली.

“कोणीसुद्धा यावर विश्वास ठेवणार नाही,” एबेनेजर म्हणाला. “चला एक फोटो घेऊ या.” त्याने श्रीमती पाल्मरचा कॅमेरा शोधून काढला. आपले डोके काळ्या फडक्याने झाकले, डुक्कराचे जोर-जोरात झाड कापतांनाचे रागीट चेहऱ्याचा फोटो त्याने काढला. मग ते दोघे बरोबर कर-कर, कर-कर अशी करवत चालवू लागले. थोड्याच वेळात झाडाचे तुकडे-तुकडे झाले आणि त्यातून गाडी बाहेर आली. पाऊसही थांबला आणि सूर्य परत चमकू लागला. आणि हवा परत गरम होवू लागली.

झाडाच्या वजनामुळे गाडीचे चाक चिखलात फसले होते. एबेनेजरला त्याचे म्हतारे पाय सरळ करून गाडीला जोरात ढकलावे लागले. आता कोणताही उशिर होवू नये अशीच पाल्मरची इच्छा होती. तसाही एवढा उशीर झालाच होता. त्याला माहित होते, घरातील लोक चिंतेत असतील.

काही वेळाने गाडी एका लांब चढावर पोहचली. मध्येच रस्त्यात गाडीला जोरात झटका लागला. गाडीच्या एका चाकाचा नट सैल होवून निघाला होता. त्यामुळे चाकाने गाडीला अलविदा म्हटले आणि जोरात डोंगरावरून खाली आले. पाल्मरने आपल्या जागेवरून उडी मारली आणि त्या चाकाच्या मागे गेला, “भावा थांब!” तो ओरडला, “कृपया थांब, नाहीतर मी कधीच घरी पोहचू शकणार नाही. माझी बायको आणि मुले वाट पहात असतील.”चाकाला पाल्मरच्या दुःखात काही रुची नव्हती. ते उड्या मारत,घसरत जोरात पळत होते. आणि बिचारे डुक्कर हताश होवून, अश्रू गाळत त्याच्या मागे धावत होते.

पाल्मरने मुलासाठी घेतलेली हार्मोनिका त्याच्या खिशात होती, तिची जाणीव त्याला झाली. त्याने ती बाहेर काढली आणि दम घेत घेत तो एक धून वाजवू लागला.

रिथ-मू, ज़ी-ज़ू,
ज़ी-ज़्वी
ज़्वाडल ब्राडल डू



चाकाला धून चांगली वाटली. तो थोडा डगमगला आणि मग धून ऐकण्यासाठी एका जागेवर लुडकला. पाल्मरने लगेच त्याच्या कमानीला पकडले आणि त्याला रागवू लागला. मग त्याला ओढत डोंगरावर आणले आणि त्यात नट बसवून पक्के केले. एबेनेजर बडबडत होता, की चाकांना आपलेच डोके असते. आत्तापर्यंत चार वाजून गेले होते.

"एबेनेज़र, तू जोरात चालू शकतो?"

“मी खूप थकलो आहे.”
पाल्मर म्हणाला, “मला माहित आहे.”
“माझ्यावर एक-दोन चाबूक मार,” एबेनेज़रने सुचवले..
“हलके नाही तर जोरात मार.”

पाल्मरने हवेत चाबुक फिरवला आणि वरून हळूच तो मारला,
“पटापट चल!” तो म्हणाला.
एबेनेज़र कोरड्या रस्त्यावरून जोरात धावू लागला.

थोडे पुढे जाताच, एबेनेज़रला रस्त्यावर एक कासव दिसले. त्याला वाचवण्याच्या नादात त्याचे खुर एका खड्ड्यात पडले. थोड्या वेळ तो लंगडला, मग रस्त्याच्या मध्येच त्याने पडून घेतले आणि दुःखाने तो कन्हू लागला, त्याच्या कन्हण्याचा आवाज दऱ्याखोऱ्यात पसरला.

"काय झालं?" पाल्मरने गाडीतून उतरून विचारले. ”पाय मुरगळला असं वाटतं.” एबेनेजर रडत रडत म्हणाला. “मागच्या डाव्या पायात.” असे म्हणत तो परत वेदनेने कन्हू लागला.



“कन्हून खरंच काही फायदा होणार आहे का? डुक्कराने अधीर होवून विचारले. “तुला खरंच असं वाटतं की पाय मुरगळला आहे?” उभे राहण्याचा प्रयत्न कर. एबेनेज़रने प्रयत्न केला. “वेदनेमुळे मी उभे राहू शकत नाही,” तो म्हणाला.

गाढव परत कण्हले, यावेळी त्याच्या आवाजात अंसतोष होता. “आता कसे तुम्ही तुमच्या चिंतेत असणाऱ्या पत्नी आणि मुलांजवळ घरी पोहचाल, हे मला मला कळत नाही. ओह मी किती विचित्र असे गाढव आहे.मला माझी लाज वाटते आहे.”

"बकवास बंद कर!" पाल्मर जोरात म्हणाला. त्याने एबेनेज़रच्या दोऱ्या सोडल्या आणि त्याला कसेबसे गाडीत चढवले.

गाढव गाडीत पडून पाल्मर शेतकऱ्याला बघत राहिले. जो आपल्या पोटावर पट्टे बांधून गाड़ी ओढत होता. ओझे ओढणाऱ्या जनावराच्यारुपात त्याचा फोटो काढत एबेनेजर ओरडला, “चमत्कारिक जोडी!"

पाल्मर शेतकऱ्याने जोरात गाडी खेचली.गाडी निघाली. लवकरच ते निघाले. एबेनेजर ते अजब वाटत होते. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. त्याला प्रवासी होण्यात मजा येत होती. तो विचार करत होता की, त्यांनी भविष्यात अशीच बदलून-बदलून गाडी चालवायला हवी.

एबेनेज़र बसल्यामुळे गाडी खूप जड झाली होती, थोड्याच वेळात डुक्कराला आपला वेग कमी करावा लागला. मग चाकांचा कर कर आवाजाच्या साथीने प्रवास सुरु राहिला.



ते हॉथोर्न-हिलला साधारणपणे सहा वाजता पोहचले. पाल्मर शेतकरी आपल्या थकलेल्या पावलांनी, ढकलत, ओढत आवाज करत कसाबसा चढावरून गाडी ओढत होता. गाडीत झोपलेल्या एबेनेजरला त्याची द्या आली. “शाब्बास पाल्मर, तो म्हणाला, “तू तर कमाल केलीस.” प्रोत्साहित करणाऱ्या या शब्दाची डुक्करालो मदत झाली. या शब्दामुळे पाल्मरला इतकी ताकद मिळाली की त्याने डोंगराच्या टोकापर्यंत गाडी चढवली.

तिथे त्याने एक क्षण आराम केला आणि पुढच्या उताराकडे पाहिले. त्याने विचार केला की आता गाडी स्वतःच स्वतःचे वजन घेवून खाली उतरेल आणि त्याला फारसे काही करावे लागणार नाही.



सुरुवात एका उडीने झाली. मग अचानक सगळे एकदम वेगात सुरु झाले. गाडी डुक्कराला पळवत होती. त्याचे पाय उलट-पालट पडत होते. तो गाडीच्या आधाराने हवेत झुलत होता. त्याचे पाय गोल गोल फिरत होते. त्याला पुरा विश्वास होता की, आज त्याचा शेवटचा दिवस आहे. त्याचा भूतकाळ त्याच्यासमोरून जावू लागला. एबेनेज़रने देवाच्या बाबत आपली निराशा व्यक्ती केली पण गाडीचे ब्रेक लागायला थोडा वेळ लागला..

चाकं खड्डे आणि दगडांना लागून उलटी झाली, एक विचित्र खबड - धबड आवाज आला आणि ते गाडीतून निघून वेगवेगळ्या दिशांना पडले. एबेनेजरने गाडीच्या मागच्या बाजूला उडी घेतली. आणि पाल्मर गाडीच्या खाली जमीन चाटू लागला.

आता गाढव,डुक्कर आणि जी गाडी कधी होती तिचे तुकडे तुकडे डोंगराच्या कोपऱ्या कोपऱ्यात पडले. “तू ठीक आहे ना?” पाल्मरने विचारले. “मी किती बरा आहे हे समजण्यासाठी मला खूप वेळ लागेल.” एबेनेज़र म्हणाला.
“तू कसा आहेस?” “सगळं काही दुखत आहे,” पाल्मर म्हणाला.
“पण गाडीशिवाय काही तुटले नाही.” त्यांनी एक-दुसऱ्याकडे बघितले आणि डोकं हलवलं. “गाडी तर आता दुरुस्त होवू शकत नाही,” डुक्कर म्हणाला.
“जगातला मोठ्यातला मोठा मॉकेनिक सुद्धा ती दुरुस्त करू शकत नाही. एबेनेज़र म्हणाला.
“आता आपण काय करायचं?" पाल्मर शेतकरी आपल्या वेदनादायी आवा जात म्हणाला.
एबेनेज़र म्हणाला, “असे वाटते की आता तुलाच मला पाठुंगळी घ्यावं लागेल.”
“एक मिनिट थांब!” त्याला सायकलची आठवण आली, जी डेझीच्या फुलांमध्ये पडली होती.

"मज़ा आली!" पाल्मर म्हणाला "बस, आता काम झालं!" तो सायकल वर स्वार झाला आणि त्याने ती थोडी चालवून पाहिली. आपलं काम होईल. त्याने हुकुम सोडला, “चल, लवकर चल!”

त्याने गाडीतली अवजारांची पेटी सायकलच्या कॅरियरला बांधली आणि कॅमेरा आणि इतर सामान एबेनेजरच्या पाठीवर दिले. मग पाल्मर सायकलवर बसला आणि एबेनेजर बसण्याची तो वाट पाहू लागला. एबेनेजर पाल्मरला पाठीमागे पकडून आणि आपल्या खुरांनी सायकलच्या हंड्ल पकडून बसला.



ते दोघे खूप थकले होते. पाल्मर थकलेल्या पायांनी थरथरत पैडल मारत होता. दोघे रस्त्यावरून आडवे-तिडवे चालले होते. थोड्याच वेळात एबेनेजर डुक्कराच्या खांद्यावर झोपून घोरू लागला. पाल्मर विचार करू लागला, “मी पण हिरव्या गवतावर झोपुत माझ्या मित्रा सारखा घोरू शकलो तर,” पण मग त्याला आपली मुले आणि प्रेमळ बायकोचे सुंदर डोळे आठवले.

मुलं आणि पत्नीच्या प्रेमामुळे त्याला चालण्त राहण्याची ताकद मिळाली. परंतु जसा-जसा सूर्य अस्ताला जावू लागला, तस तशी थकल्यामुळे सायकल अधिक आडवी-तिडवी चालू लागली.

आता एक दिवस संपत आला होता. गेटजवळ वाट पाहणाऱ्या मुलांनी पहाडावर एक मोठी आकृती आणि तिच्या पाठी बसलेली अजून एक मोठी आकृती पाहिली. त्यांनी लगेच ओळखले की, कोण येत आहे. ते आपल्या प्रश्नांच्या बरोबरीने त्यांना भेटायला वेगात पळाले.

श्रीमती पाल्मर, जी स्वयंपाकघरातून सगळं काही बघत होती. वेगाने हसत हसत आणि एकमेकांना भेटत ती ही सगळ्यामध्ये सामील झाली. तिचा पती हसतही होता आणि आनंदाने रडतही होता. म्हातारा एबेनेज़र पण त्याचा आनंद दाखविण्यासाठी जोरात खिंकाळला. सगळ्यांना यातच आनंद होता की प्रवासी सुरक्षित घरी परत आले.

थोड्या वेळाने सगळेजण जेवायला बसले. पण बिचाऱ्या एबेनेजरला अंथरुणावरच खावे लागले कारण त्याचा एक पाय मुरगळला होता आणि त्याला पोल्टी बांधली होती.